# गुजरातमध्ये भीषण विमान अपघात : १०५ जणांचा मृत्यु झाल्याची शक्यता


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १२८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १२ जून २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## एअर इंडियाचं लंडनला जाणारं फ्लाईट कोसळलं,विमानात एकूण २४२ प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अहमदाबाद**

गुजरातच्या अहमदाबादमध्ये मोठी विमान दुर्घटना घडली असून तब्बल २४२ प्रवाशांना घेऊन जाणारं प्रवासी विमान अहमदाबादच्या मेघानीनगर परिसरात कोसळलं आहे. एअर इंडियाचं ह्या विमानाने अहमदाबादहून लंडनसाठी उड्डाण केले होते. मात्र, दुपारी १.३१ वाजता केलेल्या उड्डाणानंतर अवघ्या काही मिनिटांतच विमान खाली कोसळलं. या दुर्घटनेनंतर काही वेळातच ३ अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. सध्या, एनडीआरएफचे पथक आणि प्रशासनाकडून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे. विमानातील प्रवाशांची अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. मात्र, या विमानातून गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हे देखील प्रवास करत होते, अशी प्राथमिक माहिती आहे. विमान दुर्घटनेनंतर गृहमंत्री अमित शाह यांनी गुजरातच्या मुख्यमंत्र्यांना फोन करुन माहिती घेतली, तसेच सर्वोतोपरी मदतीचे आश्वासनही दिले.

गुजरातमधील अहमदाबाद इथे एअर इंडियाच्या विमानाचा भीषण अपघात झाला असून ७०० फुटांवरुन मेघानीनगर ह्या नागरी वस्तीत हे विमान कोसळलं. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी व प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. विमानातून १० क्रू मेंबरांसह तब्बल २४२ प्रवासी प्रवास करत असल्याची प्राथमिक माहिती आहे. विमान अपघाताचे व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाले असून, जिथे प्लेन क्रॅश झालं, त्याठिकाणी धुराचे मोठे लोळ पसरल्याचं व्हिडिओतून दिसून येत आहे, घटनास्थळी विविध बचाव पथक दाखल झाले आहेत. मात्र, या दुर्घटनेत मोठी जिवितहानी झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अहमदाबादहून लंडनला म्हणजेच दूर मार्गावर जाणार असल्याने या विमानात इंधन देखील मोठ्या प्रमाणात भरण्यात आलं होतं, त्यामुळे अपघातानंतर दुर्घटनास्थळी मोठा स्फोट झाला.

**पायलटकडून दुर्घटनेपूर्वी आपात्कालीनचा संदेश**

विशेष म्हणजे विमान दुर्घटनेपूर्वी विमानाचे पायलट कॅप्टन सुमित सभरवाल यांनी आपत्कालीनचा संदेश (मे डे कॉल) दिला होता. कॅप्टन सभरवाल यांना तब्बल ८२०० तासांच्या प्रवास उड्डाणाचा अनुभव होता. विमानाने दुपारी १.३१ वाजता उड्डाण केल्यानंतर १.३८ मिनिटांनी विमानाचा शेवटचा सिग्नल मिळाला होता. त्यानंतर, ही दुर्घटना घडली.

**रुग्णालयाच्या इमारतीवर कोसळले विमान**

एअर इंडियाचं हे विमान एका इमारतीवर कोसळलं असून ती इमारत रुग्णालयाची असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार विमान ज्या रुग्णालयावर कोसळलं त्या रुग्णालयातील १५ डॉक्टर जखमी झाले असून काही रुग्णांना देखील गंभीर दुखापत झाल्याची माहिती आहे.

**एअर इंडियाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांचं ऑफिशियल स्टेटमेंट**

अहमदाबादहून लंडन गॅटविकला जाणारं एअर इंडियाचं फ्लाइट १७१ आज अपघातग्रस्त झालं, या दुर्घटनेची मी अत्यंत दुःखद मनानं पुष्टी करतो. या विनाशकारी घटनेत बाधित झालेल्या सर्व प्रवाशांच्या कुटुंबियांसह आणि प्रियजनांसोबत आम्ही आहेत. सध्या, आमचे प्राथमिक लक्ष सर्व दुर्घटनाग्रस्त प्रवाशांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यावर आहे. आम्ही घटनास्थळी असलेल्या आपत्कालीन प्रतिसाद पथकांना मदत करण्यासाठी आणि दुर्घटनाग्रस्त प्रवाशांना आवश्यक अशी सर्वोतोपरी मदत प्रदान करण्यासाठी आम्ही शक्यतो सर्व प्रयत्न करत आहोत. या दुर्घटनेची अधिक माहिती घेण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, अधिक माहिती मिळताच पुढील अपडेट्स आम्ही शेअर करू. एक आपात्कालीन केंद्र तात्काळ सुरू करण्यात आलं आहे. तसेच, दुर्घटनाग्रस्त प्रवाशांबाबत माहिती घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या कुटुंबीयांच्या मदतीसाठी पथकं नेमण्यात आली आहेत.

**एअर इंडियाचे बोईंग ७८७ विमान**

अहमदाबाद विमानतळावरून दुपारी १ वाजून ३१ मिनिटांनी ह्या विमानानं लंडनसाठी उड्डाण केल्यानंतर काही वेळातच हा अपघात घडला. अहमदाबाद विमानतळाबाहेरील मेघानीनगर रहिवाशी परिसरात विमानाचा अपघात झाला. अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर मेघानीनगरचे अंतर अंदाजे १५ किलोमीटर आहे, येथेच हा अपघात झाला आहे. अपघातानंतर लगेचच अग्निशमन दलाच्या ७ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम सुरू आहे. अपघातात मोठी जवीतहानी झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. एअर इंडियाचे ७८७ हे विमान कोसळलं असून या विमानातील प्रवासी क्षमता ३०० एवढी आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, प्रवाशांच्या सुरक्षेची चिंता व्यक्त केली जात आहे. अधिकृत माहितीची प्रतीक्षा सुरू आहे. या विमानात १० क्रू मेंबर्स आणि २४२ प्रवासी प्रवास करत होते.

**विमानात १६९ भारतीय, तर ५३ ब्रिटीश नागरिक**

एअर इंडियाच्या दुर्घटनाग्रस्त प्रवासातून एकूण २४२ प्रवासी प्रवास करत होते, त्यामध्ये १६९ भारतीय प्रवासी, ५३ ब्रिटीश नागरिक, पोर्तुगालचे ७ आणि कॅनडाचा एक नागरिक प्रवास करत असल्याची माहिती समोर आली आहे.

## राज -उद्धव ठाकरेंच्या संभाव्य युतीला ब्रेक?

### राज ठाकरे अन् मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ताज हॉटेलमध्ये भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई**

गत काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाची चर्चा सुरू आहे. पण राज ठाकरे यांनी गुरूवारी सकाळी अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमुळे मनसेसोबतच्या युतीसाठी सकारात्मक असणाऱ्या उद्धव ठाकरे यांना जोरदार झटका बसला आहे. विशेषतः राज ठाकरे आपले बंधू उद्धव यांच्यासोबत युती करणार की भाजपसोबतच राहणार? असा सवालही या निमित्ताने राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबईतील ताज लँड्स अँड हॉटेलमध्ये आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट झाली. या भेटीसाठी राज ठाकरे प्रथम हॉटेलवर पोहोचले. त्यानंतर अर्ध्या तासातच फडणवीस तिथे पोहोचले. त्यानंतर या दोन्ही नेत्यांत जवळपास दीड तास प्रदिर्घ चर्चा झाली. त्यात कोणत्या मुद्यांवर चर्चा झाली हे स्पष्ट झाले नाही. पण हे दोन्ही नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकत्र आलेत. त्यामुळे याविषयी वेगवेगळ्या अटकळी व्यक्त केल्या जात आहेत.

**फडणवीसांच्या वेळापत्रकात भेटीचा उल्लेख नव्हता**

विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आजच्या व्यस्त वेळापत्रकात ताज लँड्स हॉटेलचा कुठेही उल्लेख नव्हता. त्यामुळे त्यांची राज यांच्यासोबत झालेली ही अनपेक्षित भेट आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निर्णायक ठरेल का? विशेषतः ठाकरे गटासोबतच्या संभाव्य युतीला ब्रेक लावून मनसे लोकसभा निवडणुकीसारखाच



पुन्हा भाजपला पाठिंबा देणार का? अशी चर्चाही राजकीय वर्तुळात रंगली आहे.


**भाजपने ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाला दिला पूर्णविराम?**

उल्लेखनीय बाब म्हणजे गत काही दिवसांपासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब् ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीची चर्चा सुरू झाली होती. प्रथम राज ठाकरे व त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी एकमेकांना टाळी देण्याचे सूतोवाच केले होते. त्यामुळे या चर्चेला अधिकच बळ मिळाले होते. पण आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या राजकीय कौशल्याद्वारे ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीला पूर्णविराम दिल्याचे दिसून येत आहे.

**राज ठाकरेंचे फडणवीस शिंदेंशी चांगले संबंध**

उद्धव ठाकरे यांचा सत्ताधारी महायुतीमधील भाजप व शिवसेना शिंदे गट या दोन पक्षांना कडाडून विरोध आहे. याऊलट राज ठाकरे यांचे या दोन्ही पक्षांशी चांगले संबंध आहेत. विशेषतः त्यांचे मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चांगले मेतकुट जमते. हे दोन्ही नेते अनेकदा शिवतीर्थावर येऊन राज ठाकरे यांच्याशी हितगुज करतात. त्यामुळे राज व फडणवीस यांच्या आजच्या भेटीवर उद्धव ठाकरेंचा पक्ष कोणती प्रतिक्रिया देतो? यावर ठाकरे बंधूंच्या पुढच्या मनोमिलनाचे गणित अवलंबून असणार आहे.

## गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी त्याच विमानात....बोर्डिंग पास मिळाली




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अहमदाबाद**

गुजरातच्या अहमदाबाद शहरात गुरुवारी मोठा विमान अपघात घडला. अहमदाबादहून लंडनकडे जाणाऱ्या एअर इंडियाच्या -ख१७१ या फ्लाइटचा टेकऑफदरम्यान अपघात झाला. या विमानात २४२ प्रवासी व क्रू मेंबर्स प्रवास करत होते, अशी माहिती एएनआय या वृत्तसंस्थेने दिली आहे. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी सुद्धा प्रवास करत होते. हे आता त्यांच्या नावाचा बोर्डिंग पास समोर आल्यानंतर स्पष्ट झालं आहे.

विजय रूपाणी यांच्या प्रवासाची माहिती आधी फक्त सूत्रांमधून समोर येत होती, पण आता त्यांच्या नावाचा अधिकृत बोर्डिंग पास सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यामुळे बातमीला दुजोरा मिळाला असून, त्यांची प्रकृती सुरक्षित असल्याची माहिती सुत्रांकडून मिळते आहे, मात्र याबाबत अजून अधिकृत पुष्टी बाकी आहे. घटनास्थळी अग्निशमन दल, पोलीस व वैद्यकीय पथक दाखल झाले असून, प्रवाशांना वाचवण्यासाठी युद्धपातळीवर मदतकार्य सुरू आहे

## महाराष्ट्रात १२ हजार मतदान केंद्रांवर अनियमितता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये अनियमितता झाली असल्याचा आरोप काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी केला होता. त्यांनी लिहिलेल्या इंग्रजी वृत्तपत्रातील या सबंधित लेखाला भाजपने देखील प्रत्युत्तर दिले आहे. मात्र, त्यानंतर आता काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना याबाबत चौकशी करण्याची मागणी करणारे पत्र लिहिले आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या संभाव्य गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी आणि सध्याचे सरकार बरखास्त करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची मागणी पत्राद्वारे महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांना केली असल्याची माहिती पटोले यांनी आपल्या पोस्टमध्ये दिली आहे.

## मदत करा, पंतप्रधान मोदींचे निर्देश अमित शाह गुजरातला रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अहमदाबाद**

गुरुवारी दुपारी गुजरातच्या अहमदाबाद येथे एअर इंडियाचे लंडनला जाणारे प्रवासी विमान कोसळल्याने एकच खळबळ उडाली आहे. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्यासह २३० प्रवासी असल्याची माहिती समोर आली आहे. याच बरोबर या विमानात १२ क्रू मेंबर्स देखील असल्याची माहिती समोर आली आहे. सध्या घटना स्थळी मदतकार्य सुरु आहे.





तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांच्याशी चर्चा करुन त्यांना अहमदाबादला जाऊन विमान अपघातानंतर बाधितांना सर्वतोपरी मदत मिळावी याची खात्री करण्यास सांगितले आहे. पंतप्रधान मोदी यांच्या निर्देशानंतर गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू गुजरातला रवाना झाले आहे.या दुर्घटनेनंतर अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आणि मदत आणि बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. अहमदाबाद विमानतळाजवळील मेघानीनगरमध्ये ही दुर्घटना घडली आहे.

## मोदी सरकारच्या अकरा वर्षाच्या काळात २५ कोटी कुटुंबं दारिद्र्य रेषेबाहेर; रवींद्र चव्हाण यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आज देशातील एकूण ८१ कोटी गरीबांपैकी एकही व्यक्ती उपाशी पोटी राहू नये, याची पूर्णपणे दखल केंद्रातील नरेंद्र मोदी यांचं सरकार घेतय. पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांच्या अकरा वर्षाच्या कार्यकाळात देशातील २५ कोटी कुटुंबं दारिद्र्य रेषेबाहेर निघाली असून हे फार मोठं यश आहे, असा दावा भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आज अमरावतीत पत्रकारांशी संवाद साधताना केला.

**काँग्रेसनं गरिबांवर केला अन्याय**

२०१४ पूर्वी देशात काँग्रेसच्या नेतृत्वात असणाऱ्या यूपीए सरकारनं सर्वात जास्त अन्याय गरिबांवर केला. रोटी, कपडा, मकान या सर्व गोष्टी केवळ त्यांच्या जाहीरनाम्यात होत्या. प्रत्यक्षात मात्र गरिबांवर त्यांनी सर्वाधिक अन्याय केलाय असा आरोप देखील रवींद्र चव्हाण यांनी केला. आज पंतप्रधान आवास योजनेतून प्रत्येक व्यक्तीला स्वतःचं हक्काचं घर मिळावं यासाठी भरीव योगदान केंद्र आणि राज्य सरकार देत आहे असं देखील रवींद्र चव्हाण म्हणाले.

**सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी**

केंद्रातील नरेंद्र मोदी यांचं सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांचं सरकार हे शेतकऱ्यांच्या पाठीशी असणारं आहे. बच्चू कडू यांचं नाव न घेता शेतकऱ्यांच्या प्रश्नावर जे काही आंदोलन सुरू आहे तेच धोरण सरकारचं आहे. आंदोलनकांची दखल सरकारचे प्रतिनिधी म्हणून प्रशासकीय अधिकारी सातत्यानं घेत आहेत, असं देखील रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट केलं.

संपादकीय ......

# दारिद्र्य मुक्तीच्या दिशेने

संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीच्या (यूएनएफपीए) ताज्या जनसांख्यिकी अहवालानुसार, भारताची लोकसंख्या २०२५ मध्ये १.४६ अब्जावर पोहोचेल, असा अंदाज आहे. त्यानुसार देशातील एकूण प्रजननदर मात्र स्थिर दरापेक्षा कमी झाला असून, ही समाधानकारक बाब आहे. लोकसंख्येबाबत भारताने चीनला मागे टाकून पहिले स्थान मिळवले असले, तरी याही स्थितीत भविष्यात सकारात्मक बदल होणार, याचे हे संकेत म्हणावे लागतील. पुढील काही वर्षे लोकसंख्या वाढत राहून, ती १.७ अब्जापर्यंत जाईल आणि आणखी ४० वर्षांनी त्यात घट सुरू होईल. भारत हा मध्यम उत्पन्न गटातील देश असून, जनसांख्यिकीमध्ये झपाट्याने बदल होत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. लोकसंख्येतील घट किंवा वाढ होण्यास काही कारणे असतात आणि त्यानुसार काही भाकिते करता येऊ शकतात.

१९७० मध्ये प्रतिमहिला पाच मुलांचे प्रमाण आता प्रतिमहिला दोनपर्यंत आले. लोकसंख्या फुगत असलेली दिसत असली, तरीही तिच्या वाढीचा वेग वेगाने कमी होत आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, लैंगिक शिक्षण आदींमुळे माता मृत्यूच्या प्रमाणातही घट होत आहे. यूएनएफपीएच्या अहवालानुसार, जगात लोकसंख्येतील वाढ किंवा घट हा खरा धोका नसून, लोकांमधील मानसिक गोंधळ हा खरा प्रश्न आहे. लक्षावधी नागरिकांना किती मुलांना जन्म द्यायचा किंवा मुळात मुलांना जन्माला घालायचे की नाही, याबाबत योग्य विचारच करता येत नाही. खरे तर, लोकांमध्ये पुनरुत्पादनाची समज, गर्भनिरोधक, कौटुंबिक वृद्धी यांच्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता असली पाहिजे, अशी रास्त टिप्पणी अहवालात करण्यात आली आहे. कुटुंब नियोजनाचा पुरस्कार करणारे भारत सरकार एकमेव आहे, असे उद्गार पंडित नेहरूंनी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कुटुंब नियोजन परिषदेत त्यावेळी काढले होते.

कुटुंब नियोजन यशस्वी होण्यासाठी आर्थिक व सामाजिक विकास होणे आवश्यक आहे. शिक्षणाचा स्तर वाढेल आणि राहणीमान सुधारेल, तसतसे हे कार्य अधिकाधिक सोपे होईल, हे भान असूनही १९६१च्या दरम्यान भारताची लोकसंख्या ७.७ कोटींनी वाढली. त्यानंतरही भारताची लोकसंख्या प्रचंड गतीने वाढतच गेली. भारतात १५ ते ६४ या कमावत्या वर्षांमधील नागरिकांचे प्रमाण लोकसंख्येच्या ६८ टक्के आहे, तर ६५ वर्षांवरील निवृत्तीच्या वयातील नागरिकांचे प्रमाण फक्त सात टक्के आहे. देशात केरळ व पंजाब या राज्यांमध्ये वृद्धांची संख्या सर्वाधिक असून, बिहार व उत्तर प्रदेश ही राज्ये तुलनेने तरुण असली, तरी मागास राज्ये मानली जातात. २०३० पर्यंत वृद्धांची लोकसंख्या आताच्या प्रमाणाच्या दुपटीवर जाणार आहे. म्हणजे तरुणाईचा जो फायदा मिळत आहे, तो हळूहळू कमीच होणार आहे.

उलट ज्येष्ठांच्या आरोग्य व आर्थिक सुरक्षेवर अधिक खर्च करावा लागणार आहे. लोकसंख्या मर्यादित असणे आणि तरुणांची संख्या अधिक असणे, हे नेहमीच विकासाच्या दृष्टीने पोषक असते. खायची तोंडे दहा आणि काम करणार्यांची संख्या मात्र त्या तुलनेत कमी, यामुळेच दारिद्र्य वाढत असते. भारताने हे वर्षानुवर्षे अनुभवले; मात्र आता लोकसंख्यावाढीचा वेग कमी करण्याच्या दिशेने देश प्रगती करत असून, दारिद्र्य निर्मूलनही झपाट्याने होत आहे. यासंदर्भात भारतीय स्टेट बँकेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, पुढल्या काही काळात गरिबीचे प्रमाण ४.६ टक्क्यांपर्यंत घसरणार आहे. २०१४ पासूनच्या गेल्या अकरा वर्षांत आत्यंतिक गरिबांची संख्या २७.१ टक्क्यांवरून ५.३ टक्क्यांवर आली, अशी माहिती जागतिक बँकेच्या अहवालातही देण्यात आली आहे. देशातील ग्रामीण दारिद्र्य २०११ मध्ये २५.७ टक्के होते. ते २०२३ पर्यंत ४.८६ टक्क्यांवर आले, असे स्टेट बँकेच्या यापूर्वीच्या अहवालात नमूद करण्यात आले होते. भविष्यात शहरांमधील दारिद्र्यही अशाच प्रकारे कमी होण्याची शक्यता असल्याने दारिद्र्यमुक्तीच्या दिशेने सुरू असलेला हा प्रवास दिलासादायक आहे. पंतप्रधान आवास योजना, मनरेगा, जनधन योजनांमुळे खेड्यापाड्यांतील परिस्थिती गतीने बदलत आहे.

ग्रामीण विद्युतीकरण, दुर्गम भागांपर्यंत रस्ते आणि डिजिटल बँकिंगमुळे नोकरी, तसेच व्यवसाय-उद्योगास पूरक वातावरण निर्माण झाले आहे. डीबीटी किंवा डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फरमुळे कल्याणकारी योजनांचे फायदे कोणत्याही गळतीविना थेट लाभधारकांपर्यंत पोहोचत आहेत. शेतीमालाच्या आधारभावात नियमितपणे वाढ केली जात आहे. या भावानुसार प्रत्यक्षात खरेदी होणे आवश्यक आहे. पीक विमा योजना, खत व सिंचन अनुदानांचाही आर्थिक परिवर्तन आणण्याच्या दृष्टीने शेतकर्यांना फायदा होत आहे; पण वर्तमान व भविष्यकाळात हवामान बदलाचा शेतीला फटका बसू शकतो. त्यामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढणार आहे. याकडे स्टेट बँकेच्या अहवालात लक्ष वेधले आहे. कौशल्य विकासावर भर दिला जात असला, तरी कुशल रोजगाराच्या संधी अजून वाढण्याची गरज आहे.

ग्रामीण भागात शिक्षण व सार्वजनिक आरोग्य सुविधांचा विस्तार करणे आणि तेथे उद्योजकतेच्या संधी निर्माण करणे आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक आहे. तसेच काही राज्ये अजूनही खूप गरीब असून, राज्याराज्यांत काही भाग प्रगत, तर काही अप्रगत राहिले आहेत.







## दह्यात कालवून खा 'हे' ३ पदार्थ, लठ्ठपणा होईल कमी आणि फॅटलॉसही होईल वेगानं

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक आरोग्य**

भरपूर लोकांना रोज दही खाणं आवडतं. दही टेस्टी तर असतंच, सोबतच आरोग्यासाठी फायदेशीर देखील असतं. फार पूर्वीपासून दही आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानलं जातं. पण अनेकांना हे माहीत नसतं की, नियमितपणे आणि योग्य पद्धतीनं दही खाल्लं गेलं तर वजन कमी करण्यास खूप मदत मिळू शकते. अशात वजन कमी करण्यासाठी दही कसं आणि त्यात काय टाकून खाल्ल्यास पोटावर वाढलेली चरबी कमी करता येईल हे जाणून घेऊ.

दही एक हाय प्रोटीन आणि प्रोबायोटिक फूड आहे, जे पचन तंत्र सुधारण्यात आणि मेटाबॉलिज्म सुधारण्यास मदत करतं. दही नियमित खाल्ल्यानं पोट जास्त वेळ भरलेलं राहतं, ज्यामुळे तुम्ही जास्त अनहेल्दी स्नॅकिंग कमी खाता. तसेच यातील ॲसिडमुळे चरबी बर्न होण्यास मदत मिळते.

**दही आणि काळी मिरी पूड**

जर तुम्हाला शरीराचं मेटाबॉलिज्म बूस्ट करायचं असेल तर दही नुसतं तसं न खाता त्यात काली मिरी पूड टाकून खायला हवं. कॅलरी वेगानं कमी करण्यासाठी हे कॉम्बिनेशन खूप फायदेशीर मानलं जातं. कारण दह्यातील ॲसिड आणि काळी मिरीतील तत्व एकत्र आल्यावर चरबी कमी होण्यास मदत मिळते. यात थोडं काळं मीठ टाकाल तर फायदा अधिक मिळेल. दह्यात काळं मीठ आणि काळी मिरीची पूड टाकून खाल्ल्यास शरीर आतून स्वच्छ करण्यास मदत मिळते. म्हणजे शरीरात जमा झालेले विषारी तत्व बाहेर पडतात. पोटासंबंधी वेगवेगळ्या समस्या जसे की, गॅस, ॲसिडिटी, पोट फुगणे, बद्धकोष्ठता दूर करण्यास मदत मिळते.

**दही आणि जिरे पूड**

दह्यात जिरे पूड टाकून खाल्ल्यानं टेस्ट तर वाढतेच, सोबतच वजन कमी करण्यासही मदत मिळते. इतकंच नाही तर जिऱ्यानं पोटासंबंधी अनेक समस्या दूर होतात आणि दह्यानं पोट शांत राहतं. दही आणि जिऱ्याच्या या खास कॉम्बिनेशननं आतड्यांचं आरोग्य सुद्धा चांगलं राहतं.

**दही आणि दालचीनी**

अनेक हेल्थ एक्सपर्ट वजन कमी करण्यासाठी दही आणि दालचीनी हे एक बेस्ट कॉम्बिनेशन मानतात. दही आणि दालचीनीमधील पोषक तत्वांनी शरीराचं मेटाबॉलिज्म अधिक बूस्ट होतं. ज्यामुळे वजन कमी करण्याची प्रक्रिया अधिक वेगानं होते. फॅट बर्न होत असल्यानं वजन करण्यास मदत मिळते.

# महसुल खात्याचे क्रांतीकारी निर्णय जिल्हास्तरावर त्वरीत राबविण्यात यावे

## महसुलमंत्री तथा पालकमंत्री अमरावती चंद्रशेखर बावनकुळे यांचे जिल्हा प्रशासनाला निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

महाराष्ट्र सरकारने महसुल विभागामध्ये महत्त्वाचे निर्णय घेतले असून, अनेक नवीन उपक्रम सुरू केले आहेत. यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळणार असून, नागरिकांना दिलासा मिळावा याकरिता महाराष्ट्र राज्याचे महसुलमंत्री तथा अमरावती जिल्हयाचे पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गेल्या काही दिवसात मोठया प्रमाणात राज्यस्तरावर निर्णय पारीत केलेले आहेत.



राज्याचे वाळू-रेती निर्गती धोरण-२०२५ जाहीर झाले आहे. यानुसार, वाळू डेपो पद्धत बंद करून, लिलाव पद्धतीने वाळूची विक्री होणार आहे. तसेच, १० टक्के वाळू घरकुल बांधकामासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहे. 'वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन' सुरू झाल्याने राज्यातील कोणत्याही उपनिबंधक कार्यालयात मालमत्ता कागदपत्रांची नोंदणी करणे शक्य होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान: जनतेच्या महसुली समस्यांचे निराकरण करण्यासाठी हे अभियान राबवले जात आहे. तसेच सिंचन सुविधांसाठी धोरण विषयक विशेष योजना आखण्यात आली आहे. 'जिवंत सातबारा' मोहिमेतून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, ४ लाख उताऱ्यांवर वारस नोंदी करण्यात आल्या आहेत. एम-सँडचा वापर अनिवार्य करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. रस्त्यांवरील अतिक्रमण: शेत पांदन रस्त्यांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी मोफत पोलीस बंदोबस्त पुरवला जाणार आहे.

शेत रस्त्यांची सातबारावर त्वरीत नोंद करुन शेतक-यांना सहकार्य करावे तसेच तहसिलदार, नायब तहसिलदार यांनी गरज पडेल तेथे स्वत: शेताची पाहनी करुन शेतक-यांच्या समस्या दुर कराव्यात. अत्याधुनिक एआय ड्रोनच्या माध्यमातून खाणींची पाहणी करण्यात येणार आहे. जन्म-मृत्यू बोगस प्रमाणपत्र वितरणावर चाप बसणार असून, जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. आता घरबसल्या ई-मुद्रांक प्रमाणपत्र मिळणार आहे. शेतकऱ्यांना गाळ, माती, मुरुम विनामूल्य मिळणार आहे. घरकुल बांधकामासाठी मोफत वाळूची रॉयल्टी मिळणार आहे. शैक्षणिक प्रमाणपत्रांसाठी मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले असून, विद्यार्थ्यांना ५०० रुपये स्टॅम्पची सक्ती रद्द करण्यात आली आहे.

सलोखा योजनेने मुदतवाढ दिली असून, शेती वादांवर कायमस्वरूपी तोडगा काढला जाणार आहे. माझी जमीन, माझा हक्क अभियानासाठी राज्यस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील शहरी भागांसाठी 'नक्शा' कार्यक्रमाला शासनाची मान्यता मिळाली आहे. तरी महसुल मंत्री श्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे विभागामार्फत काढण्यात आलेल्या सर्व शासकीय निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी अमरावती जिल्हयात व्हावी व सामान्य नागरीक, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, व्यापारी, वयोवृध्द व महिला यांना या सर्व योजनांचा लाभ मिळावा व कुठलीही तक्रार येवु नये याबाबत काळजी घ्यावी असे निर्देश पालकमंत्री श्री बावनकुळे यांनी जिल्हा प्रशासनाला दिलेले आहे. या निर्णयामुळे प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि वेग येणार असून, नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

# धुळपेरणीचा मुहूर्त! मृग नक्षत्रात शेतात कपाशीची लगबग वाचा सविस्तर




**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक**
**कृषी**

यंदा मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर कपाशीच्या धूळ पेरणीला प्रारंभ झाला आहे. रोहिणी नक्षत्रात पेरणीपूर्व मशागत करून शेतकऱ्यांनी धूळ पेरणीला सुरुवात केल्याचे चित्र काही गावात शेतशिवारात दिसून येत आहे.

काही शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा तर काही शेतकरी पारंपरिक पद्धतीने पिकांची लागवड करीत आहेत. कपाशीच्या लागवडीला सुरुवात होताच शेतशिवार आबालवृद्धांनी फुलून गेल्याचे दिसत आहे.

दरवर्षी पिकांच्या भरभराटीचं स्वप्न उराशी बाळगून बळीराजा खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीला सुरुवात करतात. यंदा रोहिणी नक्षत्रात वळवाचा पाऊस पडला.

परिणामी काही काळ शेतीच्या मशागतीची कामे खोळंबली होती. मात्र, जून महिना प्रारंभ होताच वळवाच्या पावसाने उसंत घेतली. त्यामुळे शेतमशागतीस वेग आला अन् पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना पेरणीपूर्व मशागतीची कामे करणे अत्यंत सोयीचे झाले.

पावसामुळे लागवडीखालील शेतात उगवलेल्या तणाची मशागतीमुळे विल्हेवाट लावणे सोयीचे झाले. यामुळे शेतकऱ्यांचा तण व्यवस्थापनावरील खर्च कमी झाल्याचे बोलले जाते.

यंदा रोहिणी नक्षत्रात वळवाचा पाऊस पडला. परिणामी काही काळ शेतीच्या मशागतीची कामे खोळंबली होती. पावसाच्या पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत ट्रॅक्टरद्वारे बेड पद्धतीने कपाशीची लागवड केली जात आहेत. यामुळे शेतात साठवलेल्या अतिपावसातही पिकांचे रक्षण होते. पाण्याचा निचरा होणाऱ्या शेतात पारंपरिक पद्धतीने पिकांची लागवड होत असल्याचे दिसून येत आहे.

**आता १३ जुनपासून मृगाच्या पावसाला सुरूवात**

हवामान अंदाजानुसार, १३ जूनपासून मृगाच्या पावसाला सुरुवात होण्याचे चित्र उभे असल्याने जूनच्या दुसऱ्या पंधरवड्यात कपाशीच्या धूळ पेरणीला वेग येणार आहे.

जूनच्या शेवटच्या आठवड्यात सोयाबीन, तूर आदी पिकांच्या पेरणीची लगबग सुरू होणार असल्याचे शेतकरी सांगतात.

**कपाशीची धूळपेरणी म्हणजे एक प्रकारचा सट्टाच**

कपाशीची धूळपेरणी हा एक प्रकारचा सट्टाच असल्याचे शेतकरी सांगतात. कारण कमी प्रमाणात पाऊस पडून नंतर पावसाने ओढ घेतली तर बियाणे कोंब घेऊन सुकतात. त्यामुळे पेरणी वाया जाते आणि पेरणीच्या वेळी योग्य प्रमाणात पाऊस पडला तर पिकांची भरभराट येते. उत्पन्नात वाढ होते. म्हणून बहुतांश शेतकरी कपाशीच्या धूळ पेरणीला पसंती देतात.

**धूळपेरणी म्हणजे काय?**

धूळपेरणी म्हणजे पाऊस येण्याआधी, जमिनीतील ओलावा कमी असताना, किंवा पाऊस नसेल अशा स्थितीत पेरणी करणे. याला 'धुळपेरणी' असे म्हणतात, कारण यात बियाणे थेट कोरड्या जमिनीवर टाकले जाते. यात पेरणीनंतर लगेच पाऊस येणे आवश्यक असते, जेणेकरून बियाणे उगवेल.

**कपाशीची धूळपेरणी**

कपाशीच्या धूळपेरणी म्हणजे कपाशीच्या बियाणे थेट मातीत पाडून पेरणी करणे, जसे की धूळ उडवून. या पद्धतीत बियाणे मातीत जास्त प्रमाणात मिसळून जातात आणि त्यातून उगवण चांगली होते.

**कपाशीच्या धुळपेरणीचे फायदे**

वेळ आणि खर्च बचत : पारंपरिक पेरणीच्या तुलनेत धूळपेरणी कमी वेळेत आणि कमी खर्चात करता येते.

उत्पादन वाढ : योग्य पद्धतीने धूळपेरणी केल्यास कपाशीचे उत्पादन वाढू शकते.

श्रम कमी : या पद्धतीत कमी श्रम लागतात.

कपाशीच्या धूळपेरणीचे तोटे

बियाणे वाया जाण्याची शक्यता : धूळपेरणीमुळे बियाणे मातीत व्यवस्थित मिसळले जात नाही, त्यामुळे काही बियाणे वाया जाऊ शकतात.

कीड आणि रोगांचा धोका : धुळपेरणीमुळे कीड आणि रोगांचा धोका वाढू शकतो.

योग्य नाही : सर्व प्रकारच्या जमिनी आणि हवामानासाठी धूळपेरणी योग्य नसते.

धूळपेरणी करताना या गोष्टी लक्षात ठेवाव्यात

बियाणे निवड : योग्य प्रतीचे आणि चांगल्या प्रतीचे कपाशीचे बियाणे निवडावे.

जमीन: मध्यम ते भारी जमिनीसाठी धूळपेरणी योग्य असते.

पाणी : पेरणीनंतर योग्य प्रमाणात पाणी द्यावे.

कीड आणि रोग व्यवस्थापन : पेरणीनंतर नियमितपणे कीड आणि रोगांचे व्यवस्थापन करावे.

कपाशीच्या धूळपेरणीमुळे वेळ, खर्च आणि श्रम वाचतात. मात्र योग्य पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. योग्य बियाणे, जमीन आणि व्यवस्थापन केल्यास धूळपेरणी कपाशीचे उत्पादन वाढवण्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# राज्याच्या हवामानात मोठे बदल; पुढील ४ दिवसात राज्यात मुसळधार पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

मुंबईसहकोकणात लवकर दाखल झालेला मान्सून जागेवरच रेंगाळला असला तरी पुढील पाच दिवस राज्याच्या हवामानात उल्लेखनीय बदल होतील.

या बदलानुसार, गुरुवारपासून कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांतही मुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे.

मुंबईला आगमनावेळीच पावसाने दणका दिला. मुंबईची दाणादाण उडवून पाऊस बेपत्ता झाला. परिणामी, वाढत्या उकाड्याने मुंबईकर पुन्हा घामाने निथळत आहेत.

**कोकणसह मध्य महाराष्ट्रात चांगला पाऊस पडणार**

३० जूनपर्यंत पावसाची शक्यता असून त्यातील पहिल्या आठवड्यात कोकणसह मध्य महाराष्ट्रात, तर दुसऱ्या आठवड्यात मध्य भारतात चांगला पाऊस पडणार आहे. तिसऱ्या आठवड्यातही मध्य भारतातही चांगला पाऊस आहे.

थोडक्यात, पुढील तीन आवठड्यांत देशभरात चांगल्या पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, उणे ३२ पासून १०८ पर्यंतची मान्सूनची मजल मोठी असेल. जर का तसे होणार असेल तर देशात बऱ्याच ठिकाणी मोठ्या पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी पूरसदृश परिस्थितीची शक्यता आहे.




**कोणत्या जिल्ह्याला कधी ऑरेंज अलर्ट?**

पुढील तीन ते चार दिवस कोकण, विदर्भात धो-धो बरसणार.

गुरुवार : अकोला, अमरावती, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, सांगली आणि कोल्हापूर.

शुक्रवार : रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, अकोला, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली.

शनिवार : रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग.

रविवार : रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग.

**देशात मोठा पाऊस पडणार; पूरसदृश स्थिती**

हवामान शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले की, सध्या देशामध्ये पावसाचे प्रमाण ३२ टक्के कमी नोंदले गेले असताना हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जूनमधील पाऊस १०८ टक्के असण्याची शक्यता आहे.

युरोपियन आणि हवामान विभागाचे मॉड्यूलनुसार पुढील तीन आठवडे देशात चांगल्या पावसाची शक्यता आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १२ जून २०२५

शहर/ग्रामिण

## विदर्भातील शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज


## मुख्यमंत्र्यांनी केले आश्वस्त; ९० सिंचन प्रकल्प मार्गी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अकोला**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत विदर्भातील शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज पुरवठा केला जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, या योजनेद्वारे डिसेंबर २०२६ पर्यंत १६,००० मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बळीराजा जलसंजीवनी योजनेतून विदर्भातील रखडलेले ९० सिंचन प्रकल्प मार्गी लागल्याने सिंचन क्षेत्रात लक्षणीय वाढ होऊन शेती उत्पादनात सुधारणा होईल.

व्यासपिठावर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, भाजपचे कार्यकारी अध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण, प्रदेश



सरचिटणीस आ.रणधीर सावरकर आदी उपस्थित होते. अकोल्यात ११ जून रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते २,६०० कोटी रुपयांच्या निधीतून मंजूर झालेल्या १९ विकासकामांचे उद्घाटन आणि लोकार्पण करण्यात आले. यादरम्यान, भाजपच्यावतीने अकोला क्रिकेट क्लब मैदानावर 'विकास संवाद सभे' चे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले की, २०२७ पर्यंत विदर्भाचा अनुशेष संपेल, असा आम्हाला विश्वास आहे. महायुती सरकारच्या धोरणांमुळे विदर्भातील पायाभूत सुविधांमध्ये मोठी प्रगती होत असून, भविष्यातील विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**हा विजय खुर्च्या तोडण्यासाठी नाही!**

राज्यात दणक्यात महायुतीचे सरकार आले. विधानसभा निवडणुकीतील हा विजय खुर्च्या तोडण्यासाठी नव्हे तर सर्वसामान्य जनतेची कामे करण्यासाठी मिळाला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. यापुढे शासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा नव्हे तर १५० दिवसांसाठी आराखडा तयार केला जाइल,असे त्यांनी सांगितले.

**यापुढे शेतीसाठी 'एआय'चा वापर**

शेतीमधून कमी खर्चात जास्त उत्पादकता मिळवण्यासाठी भविष्यात 'एआय'चा वापर केला जाइल. किड प्रतिबंधक उपाय, खतांचा वापर करताना 'एआय'ची मदत घेतली जाइल. आधुनिक शेतीकडे वाटचाल करण्यासाठी शासनाकडून ठोस पाऊले उचलली जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## एसटीच्या अधिकाऱ्यांकडून उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न झाले नाहीत ; परिवहन मंत्र्यांच्या घोषणा हवेत!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती ७**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या कामगार संघटनांच्या बैठकीत एसटीने स्वतःही उत्पन्न मिळविले पाहिजे, असे सांगून नाराजीसुद्धा व्यक्त केली होती. परंतु, चालू उन्हाळी हंगामाचा विचार केल्यास एसटीच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून उत्पन्न वाढीसाठी काहीही प्रयत्न झाले नाहीत. त्याचप्रमाणे प्रवाशांच्या व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनीसुद्धा वेगवेगळ्या ज्या घोषणा केल्या आहेत, त्या हवेतच असून, जे अधिकारी उत्पन्न वाढीसाठी व प्रवाशांसाठी केलेल्या विविध घोषणा अंमलात आणण्याचा प्रयत्न करणार नाहीत त्यांना नारळ दिला पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केली आहे.

बरगे हे मंगळवार १० जून रोजी अमरावती जिल्हा दौऱ्यावर आले असताना त्यांनी पत्रकारांना ही माहिती दिली. यापूर्वी सुद्धा परिवहन मंत्र्यांनी वेगवेगळ्या घोषणा केल्या. परंतु, सहा महिन्यांमध्ये कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. बहुतेक सर्व घोषणा हवेत विरल्या असून, केवळ मंत्र्यांसमोर मान हलवणाऱ्या अकार्यक्षम




अधिकाऱ्यांना नारळ द्यावा आणि त्यांच्या जागी सकारात्मक काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करावी, अशी मागणीही बरगे यांनी यावेळी कोणती योजना कोणत्या विभागाने करावी या संदर्भात घोळ घातला जात आहे. काही अधिकारी हे काम माझे नाही, दुसऱ्याचे आहे, असे टोलवाटोलवीचे उत्तर देत आहेत. अशा अकार्यक्षम अधिकाऱ्यांना हटवून त्यांच्या जागी कार्यक्षम अधिकारी नेमले पाहिजेत. जेणेकरून प्रवासी व कर्मचाऱ्यांना सुविधा देणे शक्य होईल, असे मतही बरगे यांनी व्यक्त केले.

## नवी अमरावती-पंढरपूर विशेष रेल्वेच्या ४ फेऱ्या धावणार

### विठू माऊलींच्या दर्शनाची भाविकांना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

आषाढी एकादशीनिमित्त भाविकांना विठू माऊलींचे दर्शन घेता यावे यासाठी मध्य रेल्वेद्वारे अकोली येथील नवी अमरावती रेल्वे स्थानक ते पंढरपूर विशेष रेल्वेची सुविधा दिली आहे. दोन फेऱ्या भाविकांना पंढरपूर येथे नेण्यासाठी तर दोन फेऱ्या पंढरपूर येथून परत आणण्यासाठी अशा एकूण चार फेऱ्या ही विशेष रेल्वे करणार आहे. गाडी क्र. ०१११९ पंढरपूर विशेष रेल्वे नवी अमरावती येथून २ व ५ जुलै रोजी दु. २.४० वाजता वारकऱ्यांना घेऊन निघेल. त्यानंतर १८ तास ३० मिनिटांचा प्रवास करून दुसऱ्या दिवशी सकाळी ९.१० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. त्याचप्रमाणे गाडी क्र. ०१२० ही पंढरपूर येथून ३ व ६ जुलै रोजी सायं. ७.३० वाजता निघेल व नवी अमरावती रेल्वे स्थानकावर दुसऱ्या दिवशी दुपारी १२.५० वाजता पोहोचेल.



नवी अमरावती रेल्वे स्थानक ते पंढरपूर दरम्यान ही विशेष रेल्वे बडनेरा, मुर्तिजापूर, अकोला, शेगाव, जलंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगांव, पोचोरा, चाळसगांव, नांदगाव, मनमाड, कोपरगांव, बेलापूर, अहमदनगर, दौंड आणि कुर्डूवाडी या स्थानकांवर थांबा घेणार आहे. दोन तृतीय वातानुकुलित, १० शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, २ सामान्य द्वितीय श्रेणी केवळ बैठक आणि सामानासह गार्ड ब्रेक व्हॅन अशी या विशेष रेल्वेची संरचना आहे.

अमरावतीकर वारकरी, विठ्ठल भक्तांसाठी विशेष रेल्वेची सुविधा झाल्यापासून दरवर्षी शेकडोच्या संख्येत भाविक पांडुरंगाच्या दर्शनाला भू-वैकुंठ पंढरीत जात असतात. विशेष रेल्वेने जाणे ही एक पर्वणीच आहे. कारण, या भाविकांना सामाजिक संस्था, राजकीय पक्षाचे नेते निरोप देण्यासाठी येतात. चहा, नाश्ता, बिस्कीट, फळे, पाणी, प्रसादाचे वितरण करतात. त्यामुळे भाविकांना मार्गात खानपानासाठी कुठेही उतरावे लागत नाही. किंवा पैसेही खर्च करावे लागत नाही. पंढरपूरपर्यंतचा प्रवास अगदी मजेत व आरामात होतो. विठ्ठलाचे नामस्मरण करीत भाविक पंढरीला जातात. दर्शन घेऊन याच विशेष रेल्वेने परत येतात. दर्शन करता आले नाही तर चंद्रभागेत स्नान करून तसेच पांडुरंगाचे मुखदर्शन करूनही काही भाविक परत येत असतात. ज्या भाविकांना काही कारणास्तव नवी अमरावती-पंढरपूर रेल्वेने सावळ्या विठ्ठलाच्या दर्शनाला जाणे शक्य होणार नाही त्यांच्याकरिता पंढरपूरला जाण्यास गाडी क्र. ०१२०५ नागपूर-मिरज रेल्वेची सुविधा आहे. ही विशेष रेल्वे ४ व ५ जुलै रोजी बडनेराहून दुपारी १२ वाजताच्या सुमारास निघणार असल्यामुळे सुविधाजनक आहे. गाडी क्र. ०१२०६ मिरज-नागपूरने ५ व ६ जुलै रोजी परतीचा प्रवास करता येणार आहे. कारण, ही विशेष रेल्वे पंढरपूर स्थानकावर थांबा घेणार आहे.

## दर्यापूर तालुक्यात वादळ; २ बैलांचा मृत्यू

### नाद्रूण, रामागडला विद्युत तारा, खांबही वाकले घरावरील टीनपत्रे उडाली, घरासह गोठ्यांची पडझड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १२ दर्यापूर**

वातावरणात बदल होऊन बुधवारी ११ जूनला दुपारी २.३० वाजताच्या सुमारास शहरासह तालुक्यात वादळी पावसाने हजेरी लावली. हवेने रौद्ररुप धारण करून नांद्रुण,रामागड,ऊमरी , ममदाबाद व ऊमरी इतबारपूर या गावांत घरांची पडझड, टीनपत्रे उडाली. विद्युत तारा पडून खांबही वाकले असून, दोन बैलांचा मृत्यू होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.वादळी पावसामुळे नांद्रूण शेतशिवारात पाणीच-पाणी तुंबल्याने पेरणीपूर्वीच शेतकऱ्यांसमोर संकट उभे ठाकले. दुसरीकडे महावितरणचेही नुकसान झाले आहे.

चार दिवसांपासून उन्हाच्या तीव्र झळा असह्य होत होत्या. बुधवारी दुपारी वादळीवाऱ्यासह अर्धातास मुसळधार पाऊस बरसला. या वादळी पावसाने नांद्रूण येथील प्रशांत खेडकर यांच्या घराची अंशतः पडझड, दीपक सावळे यांच्या घरावरील टीनपत्रे उडून घरातील सामानाचे नुकसान झाले. रामागढ येथे गोठ्याची भिंत कोसळून अशोक लोणकर यांचा बैल ठार झाला. ऊमरी ममदाबाद येथे एका बैलाच्या अंगावर वडाचे झाड कोसळल्याने त्याचा मृत्यू झाला. तर ऊमरी इतबारपूर येथील दोन



घरांची टीनपत्रे उडाली आहेत. चांडोळा येथेही निंबाचे झाड गोठ्यावर कोसळल्याने अनिल वारुळकर यांचे नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये विद्युत तारा तुटल्या असून, खांबही वाकले आहेत. परिणामी अनेक गाव-खेड्यातील विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. तर दुसरीकडे वादळी वाऱ्याने काही गावांमधील शेतकऱ्यांची धांदल उडाली. शहरातील नगर परिषद क्षेत्रात समाविष्ट हद्द वाढ साईनगर आदी भागात काही ठिकाणी पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था नाही.त्यामुळे पावसाचे पाणी साचून आहे. प्रशासनाने पंचनामे करून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अंजनगाव शहर आणि आजूबाजूच्या परिसरात बुधवार ११ रोजी वादळी पावसामुळे वीज यंत्रणा विस्कळीत झाली. दुपारी झालेल्या पावसाने संपूर्ण तालुक्यात अनेक भागांत मोठे प्रमाणात नुकसान झाले आहे. अंजनगाव तालुक्यातील विहिगाव येथे सुयोग काळे या शेतकऱ्याने उन्हाळ्यात पिकविलेला कांदा भाव वाढीच्या आशेने आपल्या घरामध्ये साठवून ठेवलेला होता.परंतु, बुधवारी झालेल्या वादळामुळे घरावरील टिनाचे शेड उडून गेल्याने त्याच्या घराचे नुकसान तर झालेच. परंतु १०० क्विंटल कांदा पाण्याने भिजल्यामुळे या शेतकऱ्यावर आभाळ कोसळले असून सुमारे दीड दोन लाख रुपयाचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

## टेम्बो डिफेन्स ने अमरावती एमआयडीसीकडे मागितली ३०० एकर जमीन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत अंतर्गत शस्त्र व दारुगोळा निर्मितीत देशाला स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने टेम्बो डिफेन्सने अमरावतीच्या नांदगावपेठ पंचतारांकित एमआयडीसीत आयुध निर्माणी सुरू करण्यासाठी ३०० एकर जागेची मागणी केली. मात्र, सध्या १०० ते १२० एकर जागा उपलब्ध असल्यामुळे ती देण्यास आम्ही तयार आहोत, असे पत्र ८ ते १० दिवसांआधी आम्ही टेम्बो डिफेन्सला पाठवल्याचे प्रादेशिक कार्यालय एमआयडीसीने सांगितले.

### १०० एकर जागा देण्याची एमआयडीसी तयारी

TEMBO
Powering Ahead

### टेम्बो डिफेन्सला पत्र दिले

टेम्बो डिफेन्सने एमआयडीसीच्या मुंबई मुख्यालयाशी संपर्क साधल्यानंतर मुख्यालयाकडून मिळालेल्या निर्देशांनुसार अमरावतीच्या नांदगावपेठ पंचतारांकित एमआयडीसीत १०० ते १२० एकर जागा उपलब्ध असून ती देण्याची तयारी असल्याचे पत्र आम्ही कंपनीला पाठवले आहे.

**-स्नेहा पिंप्रीकर, प्रादेशिक अधिकारी, नांदगावपेठ, एमआयडीसी,अमरावती.**


यामुळे अमरावतीत आयुध निर्माणी सुरू होण्यासह रोजगाराच्या संधीही वाढणार आहेत. तत्पूर्वी मे महिन्यात टेम्बो डिफेन्सच्या तीन अधिकाऱ्यांनी एमआयडीसीच्या सर्वेअरसह जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांना ती जागाही आवडली. त्यामुळे मग आम्हीही जागा देण्याची तयारी दर्शवली. यासंदर्भात मुंबई येथील मुख्यालयालाही कळवल्याची माहितीही एमआयडीसीच्या प्रादेशिक कार्यालयाने दिली. याआधीही प्रतिभा पाटील या राष्ट्रपती असताना भारत डायनामिक्सने अमरावती येथे आयुध निर्माणी सुरू करण्यासाठी १०० एकर जागा आरक्षित केली होती. परंतु, नंतर हा प्रकल्प बारगळला. आता टेम्बो डिफेन्सच्या प्रस्तावाला एमआयडीसी विभागाने गांभीर्याने घेतले. वेगात हालचाली करून जमिन दिली, तर या भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी असेल.

## चांदूर, तिवसा बाजारपेठेत कडकडीत बंद : बच्चू कडू यांच्या उपोषणाला पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२चांदुर बाजार**

बच्चू कडू यांच्या शेतकरी प्रश्नांवरील उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी चांदूरबाजार आणि तिवसा येथे बुधवारी संपूर्ण बंद पाळण्यात आला. अमरावतीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतमालाची होळी करून सरकारविरोधात निषेध नोंदवण्यात आला.

शेतकरी नेते रविकांत तुपकर, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि माजी मंत्री रासपचे महादेव जानकर यांनी गुरुकुंज मोझरी येथील उपोषण स्थळी भेट दिली. प्रहारच्या



महिला पदाधिकाऱ्यांनी चांदूरबाजारचे तहसीलदार रामदास शेळके यांना निवेदन देऊन दोन दिवसांत तोडगा न निघाल्यास जलसमाधी घेण्याचा इशारा दिला.

बंददरम्यान चांदूर बाजार आणि तिवसा शहरातील संपूर्ण बाजारपेठ दुपारपर्यंत बंद होती. प्रहारचे तालुकाप्रमुख संतोष कीटुकले यांच्या नेतृत्वात बंद पाळण्यात आला. अमरावतीत बंटी रामटेके यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी परिसरात आंदोलन करण्यात आले.

गेल्या दोन दिवसांपासून चांदूरबाजार तालुक्यात प्रहारची विविध आंदोलने सुरू आहेत. मंगळवारी तहसील कार्यालयात मुंडन आणि विश्रोळी धरणावर जलसमाधी आंदोलन करण्यात आले. आसेगाव पूर्णा येथील कार्यकर्त्यांनी टॉवरवर चढून आंदोलन केले, मात्र प्रशासनाच्या आवाहनानंतर त्यांनी टॉवर सोडला.तिवसा येथे शहर अध्यक्ष बाळा देशमुख यांच्या आवाहनानुसार सकाळी आठ ते दुपारी तीन वाजेपर्यंत बाजारपेठ बंद ठेवण्यात आली. आंदोलकांनी मुख्यमंत्र्यांना तहसीलदारांमार्फत निवेदन पाठवून शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्याची मागणी केली आहे.

## धामक गावाच्या पुनर्वसनाकरिता अधिकाऱ्यांकडून जागेची पाहणी : गावाच्या आदर्श व दर्जेदार पुनर्वसनासाठी प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नांदगाव खंडेश्वर**

राज्यात धामक गावाचे पुनर्वसन आदर्श पुनर्वसन करण्याकरिता बेंबळा विभागाच्या संबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून जागेची पाहणी करण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार व आमदार प्रताप अडसड यांच्या सतत पाठपुराने धामक गाम पुनर्वसन करण्याच्या प्रक्रियेला युद्ध पातळीवर सुरुवात झाली आहे.

आमदार प्रताप अडसड



यांच्या सतत पाठपुराव्याने धामक गावाचे पुनर्वसन करण्याचा निर्णय राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी घेतला. परंतु, आमदार प्रताप अडसड यांनी धामक गावाचे दर्जेदार करण्याची मागणी सतत लावून धरली. त्यात राज्याचे मुख्यमंत्री अमरावती जिल्ह्यात विदर्भ बळीराजा प्रकल्प समितीच्या कार्यक्रमाकरिता आले असता त्या कार्यक्रमात धामक गावाचे आदर्श पुनर्वसन करणार अशी घोषणा केली. त्या अनुषंगाने प्रशासनाच्या वतीने आदर्श पुनर्वसनाचे प्रक्रिया सुरू केली. त्यात व्हीआयडीसीचे ई.डी सोनटक्के यांना भेटून आमदार प्रताप अडसड यांनी पुनर्वसनाचे काम युद्ध पातळीवर करण्याचे सांगितले.

> मतदार संघातील धामक गावाची ओळख महाराष्ट्र राज्यात निर्माण व्हावी. पुनर्वसनात नवीन सुख सुविधाद्वारे गावाचा सर्वांगीण विकास करून गावाचे आदर्श व दर्जेदार पुनर्वसन करून घेण्याकरिता सतत प्रयत्नशील आहे.
>
> **प्रताप अडसड, आमदार**

बेंबळा विभागाची उपविभागीय अभियंता यांनी धामक गावाची पुनर्वसनाच्या जागेची पाहणी केली. त्यात गावात नवीनची भर पडावी व गावाचे आदर्श व दर्जेदार पुनर्वसन कसे करता येईल. याकरता सतत बैठका सुरू असून पाहणी करण्यात आली आहे. यावेळी गावातील सामाजिक कार्यकर्ते अमोल इंगोले, अक्षय मस्के, माजी ग्राम पंचायत सदस्य कुशल जयस्वाल, रुपेश उघडे यांच्या सह गावकरी उपस्तित होते.

## प्रभाग रचनेच्या जीआरमुळे इच्छुकांची प्रतीक्षा शिगेला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

जिल्ह्यातील एकमेव महापालिकेसह १० नगरपालिका आणि देवेन नगरपंचायतीच्या निवडणुकीचा पहिला टप्पा सुरु झाला आहे. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रभाग रचना निश्चित करण्याचे आदेश (जीआर) सोमवारी धडकले. त्यामुळे आता जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकांचाही पहिला टप्पा सुरु होईल, अशी प्रतीक्षा व्यक्त केली जात आहे.



महापालिकेसह नगरपालिकेच्या निवडणुकांची तयारी सुरु झाल्याच्या पार्श्वभूमीवर आज, बुधवारी जिल्हा परिषदेत जोरदार चर्चा रंगली होती. नगरपालिकांच्या निवडणुकांचा पहिला टप्पा सुरु झाला, जिल्हा परिषद-पंचायत समित्यांचा केव्हा होणार, हा या चर्चेचा विषय होता. दरम्यान काही अधिकाऱ्यांच्या मते नगरविकास विभागाचा जीआर जारी झाल्यामुळे ग्रामविकास विभागाचाही जीआर निघणार आहे.कदाचित येत्या एक-दोन दिवसांत ही कारवाई पूर्णत्वास जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.महापालिकेच्या निवडणुकीसाठी शासनाने चार सदस्यीय प्रभाग हे सूत्र स्वीकारले असून प्रभाग रचनेसाठी २०१७ चेच सूत्र निश्चित केले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठीही २०१७चेच सूत्र वापरले जाणार असून जिल्हा परिषदेची निवडणूक ही ६६ नव्हे तर ५९ जागांसाठीच होणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

# आ. रोहित पवार म्हणाले बच्चू कडूंचे आंदोलन सरकारला महागात पडेल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

आमदार बच्चू कडू यांच्या आंदोलनाची सरकार दखल घेणार नसेल तर सरकारला हे महागात पडेल. मतदान मिळाल्यावर मात्र विसर पडणे हे चुकीच आहे. तिन्ही पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये कर्जमाफीचा उल्लेख आहे. ८० हजार कोटीचे रस्ते करण्यासाठी पैसे आहे, कंत्राटदाराला मोठे करण्यासाठी पैसा आहे मात्र शेतकऱ्यांसाठी पैसे नाही. मंत्र्यांना बाहेर देशात घेऊन जाण्यासाठी पैसे आहे, आयपॅड घ्यायला पैसे आहे. जनतेच्या मनात सरकारच्या विरोधात वातावरण आहे, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांनी दिला. ते आज नागपुरात पत्रकारांशी बोलत होते.

बच्चू कडू यांच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी आलो आहे. काल शरद पवार साहेब सुद्धा त्यांच्याशी बोललेले आहे. सत्तेत येण्यापूर्वी सातबारा कोरा करू म्हणत होते. अतिवृष्टी झाली नुकसान भरपाई मिळाली नाही, कोट बदलता मात्र शेतकऱ्यांचा रेनकोट तुम्हाला बदलता आला नाही. पक्षांतर सुरू आहे, मात्र भावांतर योजना अजून आणलेली नाही. सोयाबीन कपाशीचे भाव वाढत नाही. शेतकऱ्यांचा चार हजार कोटीचा नुकसान झालं. भावांतर योजना आणत नाही आणि आमची चेष्टा करता. शेतकरी हिताच्या निर्णयासाठी पाठिंबा देण्यासाठी आलेलो आहे, असे त्यांनी सांगितले. अजित दादा बोलले, सुनील तटकरे वेळ मिळेल तेव्हा सोयीचे राजकारण करत वक्तव्य करत असतात. महायुतीच्या तिन्ही पक्षाच्या नेत्यांमध्ये पहिलं वाक्य कर्जमाफी होती. आता मात्र विसर पडला असल्याचेही रोहित पवार म्हणालेत.दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार ही फक्त चर्चाच होतील परवाच्या मेळाव्याचे स्पष्ट झालं. लोकांना विश्वासात घेऊन आपला संघर्ष करावा लागेल. कुटुंब एका बाजूला राजकारण एका बाजूला असतं. पुरोगामी विचाराचा वसा घेऊन शरद पवार यांच्या सोबत आम्ही आहो. विचार तोच ठेवून आहे मात्र आता स्टाईल बदलावी लागणार आहे.. जयंत पाटील, सुप्रियाताई, आव्हाड यांच्या मार्गदर्शनात नवीन ऊर्जा मिळेल.

# सह दुय्यम निबंधकासह दोघे 'एसीबी'च्या जाळ्यात

## फ्लॅट विक्रीच्या व्यवहारासाठी मागितली पाच हजारांची लाच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

सदनिका (फ्लॅट) चे कागदपत्र पुरेसे नसतानाही त्याची विक्री करून देण्यासाठी पाच हजारांची लाच मागणाऱ्या सह दुय्यम निबंधक व त्यांच्याच कार्यालयातील एका खासगी इसमाला लाच लुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) च्या पथकाने मंगळवार १० जून रोजी पकडले.सह दुय्यम निबंधक बेबी कर्णजी मेश्राम (५७) सह दुय्यम निबंधक कार्यालय अमरावती व किशोर जयराम रायबोले (४९) रा. सिध्दार्थनगर



सिव्हील लाईन अशी आरोपींची नावे आहेत.तक्रारकर्त्याने त्यांच्या पत्नीच्या नावाने एक सदनिका २०२१ मध्ये खरेदी केली होती; मात्र काही कारणास्तव त्यांनी ती सदनिका त्यांच्याच बहिणीला विकण्याचे ठरविले. त्याकरिता ते सह दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक २ अमावती येथे विक्रीकरिता गेले होते. त्यावेळी ते खासगी एजंट किशोर रायबोले यांना भेटले असता त्याने कागदपत्रांअभावी त्या सदनिकेची विक्री होऊ शकणार नसल्याचे सांगितले.तसेच सह दुय्यम निबंधक बेबी मेश्राम यांच्या माध्यमातून मी ते काम करून देऊ शकतो, असा प्रस्तावही रायबोले याने दिला. त्यासाठी त्याने ५ हजारांची मागणी केली. याबाबत तक्रारदाराने मंगळवारीच लेखी तक्रार दिली. त्यानंतर एसीबीच्या पडताळणी कारवाईदरम्यान रायबोले याने ती रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली, तसेच त्याने तक्रारदार व बेबी मेश्राम यांचीही भेट करून दिली. त्यावेळी त्यांच्यात पैशांवरुन मोघम स्वरूपाचा संवादही झाला. त्यामुळे बेबी मेश्राम यांनी लाच स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचेही स्पष्टझाले. किशोर रायबोले याने तक्रारदाराकडून सदर रक्कम स्वीकारली. त्यामुळे दोघांनाही ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरोधात गाडगेनगर येथे सायंकाळी उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलिस निरिक्षक चित्रा मेसरे, पोलिस निरीक्षक योगेशकुमार दंदे, पोलिस कर्मचारी प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, आशिष जांभोळे, उपेंद्र थोरात, चित्रलेखा वानखडे, गोवर्धन नाईक यांनी केली.

# रस्त्याचे निकृष्ट काम; मुख्याधिकाऱ्यांनी बजावली ठेकेदाराला नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मोर्शी :**

शहरातील श्रीकृष्णपेठ येथे करण्यात येत असलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने याबाबत खुलासा करावा, अशी नोटीस नगरपरिषद मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी संबंधित कंत्राटदाराला दिली आहे.शहरातील श्रीकृष्ण पेठ येथे सुरू असलेल्या डांबरी रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप मोर्शी शहर भाजपा व काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी यांच्याकडे केला आहे. जिल्हा वार्षिक योजना नगरोत्थान अंतर्गत मोर्शी नगरपरिषदेमधील श्रीकृष्ण पेठ भागातील प्रभाग क्रमांक ७ मध्येसिंहले यांच्या घरापासून ते वानखडे यांच्या घरापर्यंत ७लाख ८५ हजार ३० रुपयाचे डांबरी रस्त्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे. परंतु या रस्त्याचे काम करीत असताना या कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचा आरोप केलेला आहे. याबाबतचे एका वृत्तपत्राने वृत्तमालिका सुद्धा प्रसारित केली आहे.त्या अनुषंगाने मोर्शी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पराग वानखडे यांनी संबंधित कंत्राटदाराला नोटीस दिली आहे. यामध्येत्यांनी म्हटले की, प्रभाग क्र ७ सिंहले यांचे घरापासून वानखडे यांच्या घरापर्यंत रोडचे डांबरीकरण करणे हे काम करण्यात आले असून सदर काम निकृष्ट दर्जाचेअसल्याबाबत तक्रार झाली आहे. त्या अनुषंगाने सदर कामाची पाहणी केली असता सदर रस्ता अनेक ठिकाणी दबत असल्याबाबत निदर्शनास आले आहे, तसेच सदर काम करून अंदाजे ३० दिवसांचा कालावधी होऊन सुध्दा सदर रोडचा वरचा कोट अजुनपर्यंत सेट झालेले नाही. याबाबत आपले लेखी स्पष्टीकरण ३ दिवसांच्या आत देण्याचे तसेच काम व्यवस्थीत करण्याबाबत सूचित केले आहे. अन्यथा सदर रोडचे कुठलेही देयक आपणास प्रदान करण्यात येणार नाही, तसेच नगरपरिषदेतर्फे नियमान्वये आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे नोटिसद्वारे सांगितले.

# दर्यापुरात खतासह बियाण्यांचा काळाबाजार रोखण्याकरिता कृषी अधिकाऱ्यांना घेराव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर**



खरिप हंगाम सुरू झाला असून शेतकऱ्यांना पावसासह पेरणीचे वेध लागले आहेत. सद्यस्थितीत बाजारात बियाणे व खतांची कृत्रिम टंचाई असल्याने कपाशी व इतर बियाणे, हवी ती खते शेतकऱ्यांना मिळेनाशी झाली आहेत. तर दुसरीकडे कृषी विक्रेते अजित १५५ या बियाणांची दलालांच्या मदतीने काळ्याबाजारात विक्री करून मलिदा लाटत आहेत.

दर्यापूर तालुक्यात खते व बियाणांचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार हा दरवर्षीच होत असतो. अशातच ग्रामीण भागात दोन ठिकाणी प्रतिबंधीत असलेल्या बियाण्यांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई झाली. तरीही खूप मोठ्या प्रमाणात प्रतिबंधीत बियाण्यांची विक्री होत आहे. त्यामुळे सर्वत्र शेतकऱ्यांची फसवणूक खूप मोठ्या प्रमाणात होत असून याचीच दखल घेण्यासाठी युवासेना (ठाकरे गट) जिल्हाप्रमुख अंकुश कावडकर यांच्या नेतृत्वात, ज्येष्ठ शिवसैनिक प्रदीप वडतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार (दि.११) तालुका कृषी अधिकारी आरती साबळे यांना घेराव घालून दर्यापूर तालुक्यातील प्रतिबंधीत बियाणे विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्याची मागणी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

दरम्यान सर्वाधिक मागणी असलेले अजित १५५ या बियाण्यांची कृषी दुकानदार चढ्या दराने विक्री करत असल्याची दिसत आहे. त्यामुळे मूळ किमतीत बियाण्यांची विक्री करावी यासंदर्भात अजित १५५ व अजित १०५ हे बियाणे दर्यापूर तालुक्यातील कोणत्या कृषी केंद्रात किती प्रमाणात साठा उपलब्ध आहे, याची यादी रोज कृषी सहाय्यकांच्या माध्यमातून शेतकरी हितार्थ प्रसिद्ध करण्यात यावी ,अशी प्रमुख मागणी याप्रसंगी युवासेना जिल्हाप्रमुख कावडकर यांनी केली आहे. कृषी कार्यालय मध्ये अचानक शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मोर्चा येताच कृषी अधिकारी व कर्मचारी यांची चांगलीच तारांबळ उडाली होती.

यावेळी शिवसेना विधानसभा संघटक बबन विल्हेकर, शहरप्रमुख गोपाल अग्रवाल,ज्येष्ठ शिवसैनिक प्रदीप वडतकर, सरपंच किशोर टाले, सरपंच संजय कोरडे, सरपंच विजय अढावू, युवासेना जिल्हा चिटणीस प्रतीक राऊत, युवासेना तालुका प्रमुख सागर गिरे, युवासेना दर्यापूर शहर प्रमुख रुपेश मोरे, भरत हिंगणीकर, राजू मानकर, दीपक बगाडे, खंडू राऊत, उपसरपंच शरद आठवले, भास्कर धोटे, प्रशांत धर्माळे, प्रशांत ठाकूर, संदीप धर्माळे तसेच शिवसैनिक उपस्थित होते.

बियाण्यांचा साठा वाटप करण्यास भाग पाडले मंगळवारी युवासेनच्या निवेदनाच्या अनुषंगाने व प्राप्त माहीतीनुसार सुरू असलेल्या कृषी केंद्र तपासणी अंतर्गत तालुका कृषी अधिकारी आरती साबळे व कर्मचाऱ्यांनी दर्यापूर शहरातील बनोसास्थीत समुद्धी कृषी केंद्राची थेट तपासणी केली असता कृषी सेवा केंद्रात साठवून ठेवलेला अजित १५५ आणि अजित १०५ कपाशी बियाण्यांचा ६०० वर पाकीटांचा साठा बाहेर काढण्यात आला. दरम्यान उपस्थित शेतकऱ्यांना नियमाप्रमाणे बियाणे वितरण करण्यास कृषी अधिकाऱ्यांनी भाग पाडले.

# कृषीकन्या द्वारे बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक सादर

## पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्न पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय अमरावती येथील ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांद्वारे मौजे गोपाळपूर येथे दि.१२ जून रोजी सोयाबीन बीज प्रक्रिया कृती प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले.

सदर प्रात्यक्षिका दरम्यान सोयाबीन बियाण्यास रासायनिक बुरशीनाशक, कीटकनाशक तसेच जैविक बुरशीनाशक व जैविक खतांची बीज प्रक्रियेचा क्रम, बीज प्रक्रिया करताना व पेरणीवेळी घ्यावयाची काळजी, बीज प्रक्रियेचे पीक उत्पादन वाढीच्या व पीक संरक्षणाच्या दृष्टीने होणारे फायदे यासंदर्भात तांत्रिक मार्गदर्शन

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा कीटकशास्त्रज्ञ डॉ. अनिल ठाकरे, व वनस्पती रोगशास्त्र विभागाचे प्रा. राहुल कळसकर यांनी केले. प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक श्वेता देशमुख यांनी केले.

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय येथील कृषीकन्यांनी सोयाबीन बियाणे पेरणीपूर्वी शिफारसीनुसार रासायनिक, बुरशीनाशक कीटकनाशक व जैविकखतांची बीज प्रक्रिया कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखविले तसेच बीज प्रक्रिया विषयी उपस्थित शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन देखील केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषीकन्या मृणाली घोडमारे, श्रुती कुकडे व निकिता बारापात्रे यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमासाठी मौजे गोपाळपूर येथील शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी व उपस्थिती बाबत सहाय्यक कृषी अधिकारी छाया देशमुख यांनी आभार मानले.

# तर शनिवारनंतर रस्त्यावर चिटपाखरूही फिरू दिले जाणार नाही, बच्चू कडूंच्या भेटीनंतर राजू शेट्टी यांची प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२गुरुकुंज मोझरी**

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी गेल्या ८ जूनपासून गुरूकूंज मोझरी येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाच्या पाचव्या दिवशी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी उपोषणस्थळी बच्चू कडू यांची भेट घेतली. यावेळी बोलताना त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली.

राजू शेट्टी म्हणाले, राज्यात दररोज ८ शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तरीही या निर्दयी सरकारला जाग येत नाही. केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतीमालाला भाव मिळत नाही. यंदा शेतकऱ्यांना सोयाबीन हमीभावापेक्षा कमी किमतीत खुल्या बाजारात विकावे लागले. क्विंटलमागे हजार रुपयांचे नुकसान सहन करावे लागले. जर उद्योगपतींना पाम तेल आयात करण्यासाठी सूट दिली नसती, तर सोयाबीनला चांगले भाव मिळाले असते. पण, हे सरकार उद्योगपतींचे आहे. आम्ही



काही अशक्य अशा मागण्या केल्या नाहीत. त्या पूर्ण कराव्यात अशी आमची अपेक्षा आहे. सरकारने बच्चू कडू यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी, शेतकऱ्यांना हलक्यात घेऊ नये. आम्हालाही आता निर्णायक भूमिका घ्यावी लागणार आहे. येत्या १४ जूनपर्यंत सरकारने मागण्यांसंदर्भात ठोस निर्णय न घेतल्यास राज्यात चिटपाखरूही फिरू दिले जाणार नाही. कडेकोट बंद पुकारला जाईल, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला.

राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली, ते म्हणाले, महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. देवेंद्र फडणवीस यांनी मुर्तिजापूरच्या प्रचार सभेत घोषणा केली होती. पण, त्याचे पुढे काय झाले. अजित पवार म्हणतात, राज्याची आर्थिक स्थिती ठिक नाही. पण, याच अजित पवारांनी कोल्हापूर दौऱ्याच्या वेळी वाहनातला एसी बिघडला म्हणून गाड्या बदलण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. एकवेळ बुलेट ट्रेनचे काम थांबवा, पण शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या, अशी आमची मागणी आहे. तीही पूर्ण करणार नसाल, तर आम्हाला रस्त्यावर उतरावे लागले.

राजू शेट्टी यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही टीका केली. ते म्हणाले, बावनकुळे यांना वाळू माफियाच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाला हेलिकॉप्टर घेऊन जाता येते, पण शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर गेल्या पाच दिवसांपासून उपोषण करणाऱ्या बच्चू कडूंची साधी भेट घेता येत नाही. त्यांना याची लाज कशी वाटत नाही, असा सवाल शेट्टी यांनी केला.

# बच्चू कडूंच्या आंदोलनाला हिंसक वळण, महामार्गावर टायर जाळून रास्ता रोको

## सकाळीच महामार्गावर पोहचून पेटविले टायर



विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२गुरुकुंज मोझरी

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी विविध १७ मागण्यांसाठी गुरूकुंज मोझरी येथे गेल्या ८ जूनपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाचा आजचा पाचवा दिवस आहे. बच्चू कडू यांची प्रकृती खालावत चालल्याने प्रहारचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. त्यातच गुरूवारी सकाळी प्रहारच्या कार्यकर्त्यांनी अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर नांदगावपेठ टोल नाक्याजवळ टायर जाळून रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

प्रहारच्या कार्यकर्त्यांनी सकाळीच महामार्गावर पोहचून टायर जाळण्यास सुरूवात केली. काही कार्यकर्त्यांनी झाडांच्या फांद्या रस्त्यावर आणून टाकल्या. त्यांनाही पेटवून देण्यात आले. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. यावेळी प्रहारच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी केली. बच्चू कडू यांच्या मागण्यांची सरकारने अजूनही दखल घेतली नाही, हे दुर्देवी आहे. सरकार जागे न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्र बंद करू, असा इशारा यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी दिला.

बच्चू कडू यांनी यापूर्वी २४ मे रोजी आणि ४ जून रोजी निवेदन दिले होते. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी याबाबत योग्य ती खबरदारी घेण्याचे आदेश दिले आहेत.

## बच्चू कडू यांच्या उपोषणाचे पडसाद; प्रहारचे कार्यकर्ते आक्रमक, अमरावतीत रास्ता रोको, परभणीत मुंडन आंदोलन

बच्चू कडू हे शेतकरी कर्जमाफी आणि दिव्यांगांना सहा हजार रुपये मानधन यासह १७ मागण्या घेऊन पाच दिवसांपासून उपोषणाला बसले आहे. तर बच्चू कडू यांना राज्यभरातून पाठिंबा वाढत आहे. तर दुसरीकडे त्यांची तब्येत खालावत चालली आहे. मात्र आंदोलनाची दखल राज्य सरकारकडून घेण्यात आली नसल्यामुळे प्रहारचे कार्यकर्ते आक्रमक झाले असून ठिकठिकाणी आंदोलनाला सुरवात केली आहे.

बच्चू कडू यांच्या आंदोलनाचा पाचवा दिवस आहे. आजच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी आंदोलनस्थळी दाखल होऊन बच्चू कडू यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. तसेच बच्चू कडू यांच्या प्रकृतीची रोहित पवार यांच्याकडून विचारपूस करण्यात आली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



### कार्यकर्ते व शेतकऱ्यांचा रास्ता रोको

सरकार कडून अद्यापही उपोषणाची दखल न घेतल्याने प्रहार आक्रमक झाले आहेत. अमरावती - परतवाडा महामार्गवर प्रहारकडून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांनी व प्रहारच्या कार्यकर्त्यांनी बससमोर झोपून रस्ता अडविला होता. यावेळी सरकार वोरोधी जोरदार घोषणाबाजी केली. अचानक करण्यात आलेल्या आंदोलनामुळे गोंधळ उडाला होता. तर मोठ्या संख्येने कार्यकर्ते रस्त्यावर आले असता पोलिसांकडून धरपकड सुरु करण्यात आली.

### धामणगावात टायर जाळून आंदोलन

दरम्यान धामणगाव शहरातील मुख्य असलेल्या शास्त्री चौकात प्रहारच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर टायर जाळत चक्काजाम केला. कार्यकर्त्यांनी यावेळी सरकार विरोधात घोषणाबाजी करण्यात केली. सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, दिव्यांगांना सहा हजार मानधन देण्यात यावं अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. तर बच्चू कडूच्या आंदोलनाची दखल घेऊन सरकारने मागण्या मान्य न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

### परभणीत मुंडन आंदोलन

मागील पाच दिवसापासून बच्चू कडू हे अमरावती येथे विविध मागण्यासाठी आमरण उपोषणास बसले आहेत. पण राज्य सरकारने अद्याप याची दखल घेतली नाही. त्यामुळे परभणीतील प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. त्यांनी आज छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात जमा होऊन सरकार विरोधात मुंडन आंदोलन केले आहे. त्याचबरोबर राज्य सरकारने दोन दिवसात दखल घ्यावी; अन्यथा राज्यभर हे आंदोलन पेटल्याशिवाय राहणार नसल्याचेही सांगितले.

### कार्यकर्त्यांचे पवनीत पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन

भंडारा : बच्चू कडू यांच्या अमरावतीमध्ये सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा आज पाचवा दिवस आहे. या आंदोलनाचे पडसाद आता भंडाऱ्यातही उमटू लागले आहेत. आज पवनी येथील प्रहारच्या कार्यकर्त्यांनी पाण्याच्या टाकीवर चढून वीरूगिरी आंदोलन केलं. या आंदोलनामध्ये दिव्यांग बांधवांसह प्रहारचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान, पवनी पोलिसांनी सर्व प्रहार कार्यकर्त्यांना ताब्यात घेतं सूचना पत्रावर सोडून आंदोलन थांबविले.

### बच्चू कडूंच्या पत्नी, मुलगा आंदोलनस्थळी

बच्चू कडू यांच्या पत्नी नयना कडू आणि त्यांचे पूत्र देवा कडू हे बुधवारी आंदोलनस्थळी पोहचले. त्यांनी बच्चू कडू यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. खासदार नीलेश लंके यांच्यासह मराठा नेते मनोज जरांगे, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर, शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी काल बच्चू कडू यांची भेट घेतली. अनेकांनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे.

# २३ जूनला वाजणार शाळेचा पहिला घंटा!२३६ दिवस चालणार

## शाळेचे कामकाज : ३० एप्रिल २०२६ पर्यंत राहणार सत्र

सुधीर केने

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

यावर्षी २३ जूनला विदर्भातील शाळेचा पहिला घंटा वाजणार आहे .एकंदर २३६ दिवस शालेय कामकाज नव्या शैक्षणिक सत्रात चालणार आहे. ३० एप्रिल २०२६ पर्यंत ते सत्र राहणार आहे. १ मे ला ध्वजारोहणानंतर शाळांना सुट्टी लागेल.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी २०२५-२६ या शैक्षणिक सत्रातील सुट्ट्यांची नियोजन केले आहे. या नियोजनात संपूर्ण वर्षभराचा कालावधी आणि त्यांची नियोजन करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार यावर्षी २३ जून रोजी शाळा सुरू होणार आहे. २३ ते २५ या कालावधी शाळा सकाळच्या सत्रात घेण्याचे आदेश प्राप्त झाले आहे. त्यानंतर २६ जून पासून नियमित दुपारचे सत्र सुरू होईल. माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया देशमुख यांनी केलेल्या नियोजनानुसार अमरावती जिल्ह्यातील प्रथम सत्र २३ जून २०२५ ते १६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राहणार आहे. प्रथम सत्रात एकूण ९५ कामाचे दिवस राहतील.१७ ऑक्टोबर २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२५ अशा एकूण नऊ दिवस दिवाळी सुट्ट्यांचा कालावधी राहणार आहे .द्वितीय सत्र ३१ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होईल, ते ३० एप्रिल २०२६ पर्यंत सुरू राहील. द्वितीय सत्रात मात्र कामाचे १४५ दिवस राहणार आहे. सन २०२५- २६ या शैक्षणिक वर्षाचा ३० एप्रिल २०२६ हा कामाचा शेवटचा दिवस राहील .यानुसार शाळेचे एकूण कामकाज २३६ दिवसांचे राहणार आहे .मुख्याध्यापकांच्या अधिकारातील सुट्या सत्र सुरू होण्यापूर्वी निश्चित करून संबंधित शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे माहिती द्यावी लागणार आहे. उर्दू माध्यमांच्या शाळांचे बाबतीत संबंधित शाळा मुख्याध्यापकांनी त्यांच्या अधिकारातील सुट्ट्या व धार्मिक सणाकरिता वापरण्यात आलेली दिवस याची माहिती द्यावी लागणार आहे. ज्या शाळांना उन्हाळ्याची किंवा दिवाळीची सुट्टी कमी करून त्याऐवजी गणेशोत्सव किंवा नाताळ यासारख्या सणाच्या प्रसंगी समायोजनाने शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांच्या परवानगीने तशा सुट्या जाहीर करता येणार आहे .१ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात येऊन हे शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यात येणार आहे.



### निवडणूक आणि नियोजन

नव्या शैक्षणिक सत्रातील नियोजन पूर्ण झाले आहे. ठरलेल्या नियोजनानुसार २३ जून पासून शाळा सुरू होतील .यावर्षी २३६ दिवस कामकाज चालेल हे स्पष्ट असते तरी या शैक्षणिक सत्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती ,नगरपालिका आणि महानगरपालिका या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे कदाचित निवडणुकांच्या सुट्ट्यांमुळे नियोजनामध्ये काही प्रमाणात बदल झाल्यास त्यात वावगे ठरणार नाही.

# अजित पवारांच्या ताफ्यातील वाहनाचा अपघात

## ‘थार’ कारला रुग्णवाहिका धडकली, कुणीही जखमी नाही; अकोल्यातील घटना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अकोला

उपमुख्यमंत्री अजित पवार आज अकोला दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात त्याच्या ताफ्यातील एका कारला रुग्णवाहिका धडकली. ही घटना घडली तेव्हा या दोन्ही वाहनांचा वेग काहीसा जास्तच होता. पण सुदैवाने त्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या संबंधीच्या माहितीनुसार, अजित वपा आज अकोला व वाशिम जिल्ह्याच्या आढावा बैठकीसाठी आले आहेत. या दौऱ्यात ते अकोल्याच्या दिशेने जात असताना त्यांच्या ताफ्यातील रुग्णवाहिकेचा अपघात झाला. अकोला शिवनी विमानतळाकडून अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात येत असताना एका रुग्णवाहिकेने ताफ्यातील थार कारला धडक दिली. त्यात कोणतेही नुकसान झाले नाही.



या अपघातानंतर अजित पवारांच्या ताफ्यातील पोलिस कर्मचाऱ्यांची एकच धांदल उडाली. त्यांनी सदर रुग्णवाहिकेच्या चालकाला ताब्यात घेतले असून, रुग्णवाहिकाही पोलिस मुख्यालयात ठेवण्यात आली आहे. विशेष म्हणजे हा अपघात घडला त्या जागेपासून हाकेच्या अंतरावरच माजी आमदार तुकाराम बिडकर यांचा अपघात झाला होता. त्यानंतर आज पुन्हा त्याच परिसरात अजित पवारांच्या ताफ्यातील वाहनाचा अपघात झाल्यामुळे बिडकर यांच्या अपघाताच्या कटू आठवणी ताज्या झाल्या.

### बिडकर यांचे फेब्रुवारीत झाले होते निधन

तुकाराम बिडकर यांचे गत फेब्रुवारी महिन्यात अपघाती निधन झाले होते. फेब्रुवारी महिन्यात भाजपच्या अमरावती विभागातील कार्यकर्त्यांची अकोल्यातील सिटी स्पोर्ट्स क्लब येथे बैठक होणार होती. या बैठकीला राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कामगार मंत्री आकाश फुंडकर, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके हजर होते. माजी आमदार तुकाराम बिडकर हे चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटण्यासाठी सिटी स्पोर्ट्स क्लब येथे गेले होते. भेटीनंतर दुचाकीवरून परतत असताना जनावरे वाहून नेणाऱ्या मालवाहू वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. या धडकेत तुकाराम बिडकर यांच्यासह त्यांच्यासोबत असलेले त्यांचे सहकारी राजदत्त मानकर गंभीर जखमी झाले होते. त्यात या दोघांचा रुग्णालयात मृत्यू झाला.


### अकोल्यात राष्ट्रवादीचा कार्यकर्ता मेळावा

उल्लेखनीय बाब म्हणजे अजित पवार गुरूवारी सकाळी ९.३० वा. अजित पवार अकोला शिवणी विमानतळावर दाखल आझाले. तेथून ते थेट आढावा बैठकीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. या बैठकीला राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आमदार अमोल मिटकरी यांच्यासह अकोला व वाशिम जिल्ह्यातील बहुतांश आमदार उपस्थित होते. अजित पवार या बैठकीनंतर आमदार अमोल मिटकरी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देणार आहेत. त्यानंतर अकोल्यातल्या पोलीस लॉन या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात काँग्रेसचे माजी महापौर मदन भरगड आणि तसेच इतर पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश होणार आहे.

# रेल्वेचे तत्काल तिकीट मिळणार गरजवंतांना, एजेंटला द्यावा लागणार आधार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती

आपत्कालीन स्थितीत रेल्वेचा प्रवास आदल्या दिवशी तिकीट आरक्षित करून करता यावे म्हणून रेल्वेने तत्काल तिकीट सुरू केली. परंतु सकाळी १० वाजता तिकीट विक्री सुरू होताच काही मिनिटात सर्व तिकीटे विकली जातात. हे कसे काय होते, याचा सामान्य प्रवाशांना थांग पत्ता लागत नाही. त्यावर आधार शिवाय तत्काळ तिकीट मिळणार नाही, हा नियम




सर्वसाधारण प्रवाशांना दिलासा देणारा ठरू शकतो. लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांचे ‘तत्काल’ आरक्षण केवळ ‘आधार’ प्रमाणित वापरकर्त्यांनाच करता येणार आहे. १ जुलैपासून याची अंमलबजावणी होणार असून १५ तारखेपासून आधार आधारित ‘ओटीपी’ प्रमाणिकरणही अनिवार्य असेल. तसेच तत्काल तिकिटे काढण्यास सुरुवात झाल्यानंतर ती ३० मिनिटांच्या कालावधीपर्यंत आरक्षित होणार नाहीत. तत्काल आरक्षणामध्ये मोठी गडबड होत असल्याचे रेल्वेने केलेल्या एका सर्वेक्षणातून समोर आले होते. वातानुकूलित डब्यांसाठी सकाळी १० वाजता आणि सर्वसाधारण डब्यांसाठी सकाळी ११ वाजता तत्काल तिकीट आरक्षण खुले होते. मात्र आरक्षण सुरू झाल्यानंतर दुसऱ्याच मिनिटापासून तिकिटे प्रतीक्षा यादीत जात असल्याच्या तक्रारी आहेत. परिणामी, तत्काल सुविधेचा कोणताही लाभ सर्वसामान्य प्रवाशांना होत नसल्याने रेल्वे मंडळाने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार अधिकृत तिकीट दलालांना तत्काल तिकिटे सुरू झाल्यापासून पहिल्या ३० मिनिटांत आरक्षण करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

# अनेक कार्यक्षम अधिकारी असतांना भातकुलीच्या बीडीओंची एकाच अधिकाऱ्यावर मेहेरबानी का?

## भातकुली पंचायत समितीतील पक्षपाती वागणुकीवर नागरिकांचा सवाल


विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती

भातकुली पंचायत समितीमधील कार्यपद्धतीवर सध्या गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. तालुक्यातील जळका हिरापूर, साउर, वातोंडा हिम्मतपूर, पोहरा पूर्णा आणि देवरी निपाणी या पाच गावांचा प्रभार सांभाळणाऱ्या एका ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडे आता सहाव्या गावाचे म्हणजेच म्हैसपूर ग्रामपंचायतीचेही कामकाज देण्यात आले आहे.या निर्णयामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. भातकुली तालुक्यात अनेक अनुभवी व कार्यक्षम ग्रामपंचायत अधिकारी कार्यरत असतानाही केवळ एका अधिकाऱ्यावरच तब्बल सहा गावांची जबाबदारी का दिली जाते आहे, असा थेट सवाल नागरिक आणि स्थानिक प्रतिनिधी विचारत आहेत. या पार्श्वभूमीवर पंचायत समितीचे बीडीओ आणि विस्तार अधिकारी यांच्यावर ‘पक्षपाती वागणूक’ आणि ‘विशेष मेहेरबानी’चे आरोप होत आहेत. यामागे मर्जीतील व्यवहार किंवा खाजगी फायदे असल्याची चर्चा काही गावकऱ्यांमध्ये सुरू आहे. तालुक्यातील इतर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडे केवळ एक किंवा दोन ग्रामपंचायतींचा प्रभार आहे, तर या एका अधिकाऱ्यावर सहा ग्रामपंचायतींचे दायित्व सोपवणे हा सहा गावातील जनतेसाठी अन्यायकारक निर्णय आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. या निर्णयामुळे संबंधित अधिकारी सहा गावांना योग्य न्याय देऊ शकतील का? विकासकामे, निधीचे वितरण, ग्रामसभा आयोजन, आणि गावातील दैनंदिन प्रशासकीय प्रक्रिया या सर्वांवर विपरीत परिणाम होणार नाही का? या बाबत नागरिक चिंतित आहेत.या प्रकरणात पंचायत समिती प्रशासनाने खुला आणि पारदर्शक खुलासा द्यावा, अशी मागणी नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. अन्यथा या निर्णयाविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा काही गावकऱ्यांनी दिला आहे.

# मेळघाटात वादळी पाऊस; सेमाडोह पर्यटन संकुलात झाडं कोसळली; माखला गावात घरांचं नुकसान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२मेळघाट

मेळघाटात बुधवारी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस बरसला. पावसासोबत आलेल्या वादळामुळं सेमाडोह पर्यटन संकुलात अनेक झाडं कोसळली, तर सेमाडोहपासून १२ किलोमीटर उंच पर्वतावर वसलेल्या माखला गावात अनेकांच्या घरांची पडझड झाली. वादळी पावसामुळं सेमाडोह पर्यटन संकुल परिसरात आठ ते दहा मोठी झाडं खाली कोसळली. काही झाडं यामुळं पर्यटकांच्या निवासासाठी बांधण्यात आलेल्या घरांवर कोसळल्यामुळं काही घरांच्या छताला भेगा पडल्या. बुधवारी सुदैवानं पर्यटन संकुलात कोणीही पर्यटक नव्हते. पर्यटन संकुल परिसरात झाडं कोसळल्यामुळे दुसऱ्या भागात



जाणंदेखील कठीण झालंय. वादळामुळं परिसरात विजेची तार तुटलीय. संकुल परिसरात मोठं नुकसान झालं, अशी माहिती सेमाडोह वन परिक्षेत्र अधिकारी प्रदीप तळखंडकर यांनी दिली.

### माखला गावात हाहाकार

बुधवारी दुपारी जोरदार वारे सुटलं आणि ग्रामस्थांची धावपळ सुरू झाली. वादळामुळं अनेक घरांवर असणारी पत्रे उडून गेलीत. वादळामुळं गावात खळबळ उडाली असतानाच काही वेळातच मुसळधार पाऊस कोसळायला लागला. पावसाचं पाणी जवळपास गावातील आदिवासी बांधवांच्या ६० ते ७० घरात शिरलं, यामुळं घरात ठेवलेलं धान्य खराब झालंय. यापूर्वी गावात असं वादळ कधीही आलं नाही, असं ग्रामस्थांचं म्हणणं असल्याची माहिती माखला येथील रहिवासी धनंजय सायरे यांनी दिली.

### जंगलात अनेक झाडं कोसळली

वादळी पावसामुळं सेमाडोह ते चिखलदरा मार्गावरील घनदाट जंगलासह माखला गावालगत घनदाट जंगलात आंबा, जांभूळ, मोह यासह अनेक झाडं कोसळलीत. मेळघाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या अचलपूर आणि परतवाडा या जुळ्या शहरांनाही वादळी पावसानं बुधवारी झोडपून काढलं. वादळामुळं परतवाडा ते अमरावती मार्गावर अनेक झाडं कोसळल्यानं हा मार्ग दुपारपासून बंद आहे. हा मार्ग मोकळा करण्याचं काम गुरुवारी कालपर्यंत सुरू होतं.